# रहिमतपूर सहकारी बँक लि; रहिमतपूर

नोंदणी क्र. SAT/(KGN)/BNK/(O)/121 Dt. 09/04/1997

हेड ऑफिस : ९१७, बाजार पेठ, मेन रोड, सिटी सर्व्हे ऑफीस शेजारी; रहिमतपूर

ता.कोरेगाव, जि. सातारा-४१५५११

## एकोणतिसावी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

**रहिमतपूर सहकारी बँक लि; रहिमतपूर या बँकेची (२९) एकोणतिसावी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २२/०८/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता नगर वाचनालय येथील "अजितदादा सभागृह, रहिमतपूर" ता. कोरेगाव, जि. सातारा येथे बँकेचे चेअरमन मा. श्री. सुनिल गुलाबराव माने यांच्या अध्यक्षतेखाली आयोजीत केली आहे. तरी सदर सभेस आपण अगत्याने उपस्थीत रहावे. हि विनंती.**

### ★☆ सभेपुढील विषय ☆★

१. मागील सभा दि. २७/०९/२०२५ रोजी झालेल्या २८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि. ३१ मार्च २०२६ अखेरचा बँकेच्या कामकाजाचा वार्षिक अहवाल तसेच शासकिय लेखापरिक्षक यांनी प्रमाणित केलेले ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रक स्विकृत करणे.
३. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षक यांची नेमणुक करणे.
४. मा. संचालक मंडळाने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता मे. एस्.यु. कटारिया ॲण्ड कं; सातारा यांची अंतर्गत लेखापरिक्षक (इंटरनल ऑडीटर) म्हणून केलेली नियुक्ती व ठरविलेला मेहनताना यांस कार्योत्तर मंजुरी देणे.
५. सन २०२५-२६ सालचे वैधानिक लेखापरिक्षक यांचेकडून प्राप्त झालेला लेखापरिक्षण अहवाल वाचून स्विकृत करणे.
६. सन २०२४-२५ या वर्षाच्या शासकिय लेखापरिक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती पुर्तता अहवालाची नोंद घेणे.
७. सन २०२५-२६ या वर्षात अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे तसेच सन २०२६-२७ या सालाकरिता तयार केलेल्या उत्पन्न व खर्चाच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
८. मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२५-२६ च्या नफा वाटणीस मंजुरी देणे तसेच लाभांश जाहीर करणे.
९. सन २०२५-२६ मध्ये एकरक्कमी कर्ज परतफेड व तडजोड योजनेनुसार केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणे.
१०. दि. ३१/०३/२०२६ अखेर संचालक व संचालक नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची व येणे बाकीची नोंद घेणे.
११. वैधानिक लेखापरिक्षक यांनी प्रमाणित केलेली वसुल न होणारी थकीत, बुडीत कर्जे निर्लेखित करणेस मंजुरी देणे.
१२. प्रस्तुत वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१३. मा. अध्यक्षसो यांचे परवानगीने ऐनवेळच्या विषयांवर चर्चा करणे.

स्थळ : रहिमतपूर
दिनांक : ०५/०८/२०२६

मा. संचालक मंडळाचे आदेशावरुन
श्री. तानाजी लक्ष्मण रणदिवे
(मुख्य कार्यकारी अधिकारी)

विशेष सूचना :-

१) गणसंख्येच्या अभावी (कोरमअभावी) सभा तहकुब झाल्यास, बँक पोटनियम क्र. ३५ अन्वये सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी सकाळी ठिक ११.३० वाजता घेण्यात येईल सदर सभेस कोरमची आवश्यकता राहणार नाही. २) बँकेचा दि. ३१/०३/२०२६ अखेरची वार्षिक माहीती, वैधानिक लेखापरिक्षकांनी तपासलेले व संमंत केलेले ताळेबंद पत्रक, नफा तोटा पत्रक, वैधानिक लेखापरिक्षकांना अहवाल मुख्यालय तसेच सर्व शाखेच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेत आला आहे. तसेच बँकेची वेबसाईट www.rahimatpur.bank.in यावर पहावयास मिळेल. ३) ज्या सभासदांना अहवाल व ताळेबंद, नफा तोटा पत्रकासंबंधी काही प्रश्न विचारावयाचे आहेत त्यांना ते सभेपुर्वी किमान ८ दिवस अगोदर कार्यालयीन वेळेत लेखी स्वरूपात मुख्यालयाकडे पाठवावी म्हणजे माहीती देणे व्यवस्थापनाला शक्य होईल. ४) ज्या सभासदांचा लाभांश सेव्हींग खात्यावर जमा झाला नाही त्यांनी के.वाय.सी. पुर्ततेसह खाते उघडून तो जमा करून घ्यावा अन्यथा नियमाप्रमाणे ३ वर्षावरील लाभांशाची रक्कम राखीव निधी खाती जमा केली जाईल याची नोंद घ्यावी. ५) आदर्श पोटनियमानुसार बँकेच्या भागाची दर्शनी किंमत रू. १०००/- झाली असून ज्या सभासदांची शेअर्सची रक्कम अद्याप अपुरी आहे त्यांनी अपुर्ण भागभांडवलाची रक्कम लवकरात लवकर भरून सहकार्य करावे. ६) रिझर्व्ह बँकेच्यानिर्देशानुसार सर्व सभासदांची सी.के.वाय.सी. करणे आवश्यक असून त्यासाठी सभासदांनी आधारकार्ड व पॅनकार्डची प्रत, फोटो व मोबाईल क्रमांक संबंधीत शाखेमध्ये जमा करून सहकार्य करावे. ७) सेव्हींग व चालू ठेव खात्यावर सलग २ वर्षापेक्षा जास्त काळ व्यवहार न केल्यास आपले खाते निष्क्रिय (Dormant) होईल व सदर खाते नियमित करणेसाठी पुन्हा (K.Y.C.) द्यावी लागेल तसेच ज्या खातेदारांची खाती Dormant खात्यामध्ये वर्गिकृत झालेली आहेत अशा खातेदारांनी (K.Y.C.) पुर्ण करून बँकेस सहकार्य करावे. ८) नवीन पोटनियमानुसार प्रत्येक सभासदाने क्रियाशिल सभासद पात्रता निकष पुर्ण करणेसाठी ५ वर्षातून किमान एकदा वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे आवश्यक आहे तसेच इतर अटींची पुर्तता करावी.